**ठळक बातम्या**

- दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेला राज्य सरकारची मान्यता, मुंबईतल्या प्रवेशमार्गांवर लहान वाहनांना आज मध्यरात्रीपासून टोलमाफी

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची आज अल्जेरियाच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठक

- नौदलाच्या वैद्यकीय सेवेच्या महासंचालक म्हणून सर्जन व्हाइस ॲडमिरल कविता सहाय यांची नियुक्ती

**आणि**

- अमेरिका इस्राइलला अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणाली देणार

**<><><><><>**

राज्य सरकारनं आज दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेला तसंच आष्टी उपसा सिंचन योजनेला सुधारित मान्यता दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. मुंबईतल्या ५ प्रवेश मार्गांवरचा हलक्या वाहनांसाठीचा टोल माफ करायचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला. त्याची अंमलबजावणी आज मध्यरात्रीपासून होणार आहे. मुंबईतल्या प्रवेशद्वारांवर होणारी गर्दी कमी करण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. हा निर्णय निवडणुकीपुरता नसून कायमस्वरुपी राहणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. इमारत कामगार मंडळाच्या कामगारांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत द्यायचा निर्णयही आज मंत्रीमंडळाच्या बैठकीत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

याशिवाय दि. बा. पाटील यांच्या नावानं आगरी समाजासाठी महामंडळ स्थापन केलं जाणार आहे. राज्यात प्रधानमंत्री शहरी आवास योजनेचा दुसरा टप्पा

राबवायला आणि पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मार्गिकेच्या कामांनाही आज राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी मिळाली.

खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी तसंच नळस्टॉप-डहाणूकर कॉलनी-वारजे-माणिकबाग या मार्गावर या मेट्रो धावणार आहेत. मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी  पंधरवडा साजरा केला आहे. तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचं नामकरण पद्मविभुषण रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ होणार आहे. अडचणीतल्या सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करणं, अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळ आणि उमेदसाठी अभ्यासगट स्थापन करायलाही राज्य सरकारनं मान्यता दिली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा खटला जलदगती न्यायालयात चालवू.  या प्रकरणातल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करू असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं.

सिद्दीकी यांच्या हत्याप्रकरणातील तिसरा आरोपी प्रवीण लोणकर याला मुंबई पोलिसांनी पुण्यातून अटक केली. प्रवीणचा भाऊ शुभम फरार आहे. हे दोघंजण अकोल्यातल्या अकोट इथले रहिवासी आहेत. या दोघांनीच बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कट रचल्याचा पोलिसांना संशय आहे. प्रवीण लोणकर याची मुंबई पोलिस चौकशी करत असून आज त्याला न्यायालयात हजर केलं जाणार आहे. सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगनं घेतल्याची पोस्ट शुब्बू लोणकर या व्यक्तीनं त्याच्या अकाउंटवरून पोस्ट केली. या पोस्टमध्ये सलमान खान आणि दाऊद गँगचाही उल्लेख होता.  पोलिसांनी या अकाऊंटचा शोध घेतला असता ते शुभम लोणकर याचेच असून त्यानंच ही पोस्ट लिहिली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज अल्जेरियाच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. अल्जेरिया-भारत आर्थिक मंचाला संबोधित करणार आहेत. अल्जेरिया, मॉरिटानिया आणि मलावी या तीन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात काल त्या अल्जेरियाची राजधानी अल्जीयर्स इथं पोहचल्या. अल्जेरियाचे अध्यक्ष अब्देल मादजीद तेब्बौने यांनी त्यांचं स्वागत केलं. राष्ट्रपतींनी काल अल्जेरियातल्या भारतीय समुदायाशी देखील संवाद साधला.  राष्ट्रपती आज आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी अल्जेरियातल्या माकम इचाहिद या शहिद स्मारकाला भेट देणार आहेत. फ्रेंच वसाहतवादाविरुद्ध अल्जेरियाच्या संघर्षाच्या आठवणी जतन करणाऱ्या मौदजाहिदच्या राष्ट्रीय संग्रहालयालाही राष्ट्रपती भेट देतील.

**<><><><><>**

केंद्र सरकारने जम्मू काश्मीरमधली राष्ट्रपती राजवट उठवली असून, आता तिथे नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्सचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी नवीन सरकार स्थापनेचा दावा केला आहे.

**<><><><><>**

देशातली सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ८० टक्के नागरिकांपर्यंत अवघ्या २२ महिन्यात ५-जी दूरसंचार सेवा पोहोचली आहे. ५ जी मुळे २०४० पर्यंत अर्थव्यवस्थेत ४५ कोटी अमेरिकन डॉलरपेक्षा अधिक गुंतवणूक होईल, अशी आशा केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी व्यक्त केली. नवी दिल्लीत ५ व्या ग्लोबल स्टॅंडर्ड सिम्पोसियममध्ये ते बोलत होते.

भारतात अतिशय कमी खर्चात मोठमोठे शोध लागत आहेत. त्यामुळं इतर अनेक देशांसाठी भारत आदर्श असल्याचं आंतरराष्ट्रीय दूरसंचार युनियनच्या महासंचालक डोरीन बोगडन मार्टिन यावेळी म्हणाल्या.

**<><><><>**

मोठ्या प्रमाणात होणारं वायू प्रदूषण लक्षात घेता दिल्ली सरकारनं सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर बंदी घातली आहे. ही बंदी आजपासून १ जानेवारी २०२५ पर्यंत लागू असेल. दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीने हा आदेश जारी केला असून फटाक्यांच्या ऑनलाईन विक्रीवरही बंदी घालण्यात आली आहे. हिवाळ्यात संभाव्य प्रदूषण लक्षात घेऊन ही बंदी घातल्याचं दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी सांगितलं. दिल्लीकरांनी सरकारला सहकार्य करावं असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><>**

मुंबईहून न्यूयॉर्कला जाणाऱ्या एअर इंडियाचं विमान बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाल्यानंतर आज सकाळी दिल्ली विमानतळावर ते तातडीनं उतरवण्यात आलं. विमानाची तपासणी केली असता कोणतीही आक्षेपार्ह वस्तू मिळाली नाही. विमानातील सर्व प्रवासी सुखरूप आहेत. मुंबईहून मस्कतला जाणाऱ्या इंडिगो विमानही बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाली होती. त्यानंतर या विमानाची कसून तपासणी केली जात आहे. इंडिगोच्या मुंबईहून जेद्दाला जाणाऱ्या विमानातही बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली.

दरम्यान, मुंबई हावडा गाडीही टाईम बॉम्बनं उडवण्याची धमकी मिळाली. त्यानंतर ही गाडी जळगाव रेल्वे स्थानकात थांबवण्यात आली. तिथं संपूर्ण गाडीची तपासणी केली असता कोणतीही आक्षेपार्ह वस्तू न मिळाल्यानं ही गाडी रवाना करण्यात आली.

**<><><><>**

नौदलाच्या वैद्यकीय सेवेच्या महासंचालक म्हणून सर्जन व्हाइस ॲडमिरल कविता सहाय यांनी आज पदभार स्वीकारला. ३० डिसेंबर १९८६ पासून त्या लष्कराच्या

वैद्यकीय सेवेत आहेत. पुण्यातल्या Armed Forces Medical College मधून त्यांनी शिक्षण घेतलं आहे. दिल्लीतल्या भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतून त्यांनी पॅथॉलॉजी आणि ऑन्कॉलॉजीमध्ये उच्च शिक्षण घेतलं आहे. २०२४ मध्ये त्यांना सेना पदक आणि २०१८ मध्ये विशिष्ट सेवा पदकानं गौरवण्यात आलंय. आर्मी मेडिकल कॉर्प्सच्या कलोनल कमांडट म्हणून निवड झालेल्या त्या पहिला महिला अधिकार आहेत.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या बहरैच जिल्ह्यातल्या हर्डीमध्ये परिस्थिती तणावपूर्ण मात्र नियंत्रणात आहे. याठिकाणी इंटरनेट बंद करण्यात आलंय. दोन गटात उफळलेल्या संघर्षानंतर इथं एका युवकाचा काल मृत्यू झाला होता आणि काही जण जखमी झाले होते. याप्रकरणी राज्य सरकारनं दोन पोलिसांना निलंबित केलं आहे. तसंच गोळीबार करणाऱ्या एकाला पोलीसांनी अटक केली आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारी या ठिकाणी तळ ठोकून आहेत.

**<><><><><>**

केरळमध्ये तामिळ-मल्याळम चित्रपट अभिनेता बाला याला आज सकाळी कोची पोलिसांनी अटक केली. बाला यांनी समाज माध्यमावर आपला अपमान केल्याचा आरोप करत त्याची पूर्वाश्रमीची पत्नी आणि गायिका अमृता सुरेश यांनी त्याच्याविरुद्ध तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरुन त्याला अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

फेडरेशन ऑफ मेडिकल असोसिएशननं कनिष्ठ डॉक्टरांच्या उपोषणाला पाठिंबा देत आज सकाळी ६ वाजल्यापासून ४८ तास काम बंद करण्याचं आवाहन

केलं आहे. या बंदमध्ये आपत्कालीन सेवांचा समावेश नसल्याची माहिती असोसिएशनच्या वतीनं डॉ. स्वरोद्योत मुखर्जी यांनी दिली. राज्य सरकारसमोर आपल्या मागण्या मांडण्यासाठी सर्व डॉक्टर आज सकाळी ९ वाजल्यापासून १२ तासांसाठी उपोषणाला बसले आहेत.

**<><><><><>**

अत्याधुनिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली आणि ते चालवण्यासाठी शंभर सैनिकांची कुमक इस्रायलला पाठवणार असल्याची घोषणा अमेरिकेने आज केली. T H A A D अर्थात टर्मिनल हाय अल्टिट्यूड एरिया डिफेन्स सिस्टम नावाची ही क्षेपणास्त्र प्रणाली इस्रायलला पाठवण्याचे आदेश अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी संरक्षण मंत्री लॉईड ऑस्टीन यांना दिले आहेत. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांवर जमिनीवरून मारा करण्याची क्षमता या प्रणालीत आहे. इराणने १ ऑक्टोबरला इस्रायलवर क्षेपणास्त्र डागल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेनं हे पाऊल उचललं आहे.

दरम्यान, इस्रायलमध्ये आपलं सैन्य पाठवून अमेरिका त्यांचा जीव धोक्यात घालत आहे, असं इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अराकची यांनी म्हटलं आहे. कुठल्याही परिस्थितीत इराण आपलं संरक्षण करू शकतो असं ते म्हणाले.

**//<><><><><>//**